**<u>नियमित दिवाणी दावा क्र.२७४/२०२१ मधील निशाणी २६ खालील आदेश</u>**

(सदाशिव घाडगे वि. रविंद्र घाडगे वगैरे)
*(CNR No-MHSN150014682021)*

वादीने प्रस्तुतचा अर्ज वादी क्र.१ कै.सदाशिव निवृत्ती घाडगे यांचे वारस अभिलेखावर आणणेसाठी दाखल केलेला आहे.

(२) वादींनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होऊन, वादीचे हिश्श्याचा पृथक व अलग कब्जा मिळणेकरिता दाखल केलेला आहे. वादींचे असे कथन आहे की, वादी हे अशिक्षित असलेने व कायद्याचे ज्ञान नसलेने वादी क्र.१ कै.सदाशिव निवृत्ती घाडगे हे दि.०१/११/२०२१ रोजी मयत झालेनंतर त्यांचे वारस रेकॉर्डवर मुदतीत आणावे लागतात याबाबतची कायदेशीर प्रोसिजरची माहिती नसलेने वादी क्र.१ यांचे वारसांची नावे अभिलेखावर घेणेचे राहून गेलेले आहे. त्यामुळे, वादी क्र.१ यांचे नांवापुढे 'मयत वारस' असे घालणेत येऊन त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेत यावेत अशी विनंती वादी यांनी केलेली आहे.

(३) प्रतिवादींतर्फे निशाणी २६ वर म्हणणे सादर करुन अर्जात उल्लेख केलेप्रमाणे वारस बरोबर असलेचे कथन केले आहे.

(४) निशाणी २६ कडील अर्ज, त्यावरील म्हणणे व त्या पुष्ट्यर्थ दाखल केलेले प्रतिज्ञापत्र यांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादीतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादीचे कथनाप्रमाणे वादी क्र.१ कै.सदाशिव निवृत्ती घाडगे हे दि.०१/११/२०२१ रोजी मयत झाले असून अर्जात उल्लेख केल्याप्रमाणे त्यांचे वारस हे प्रस्तुत दाव्याचे कामी आवश्यक पक्षकार झालेले आहेत. त्यांचा मृत्यूच्या दाखल्याची प्रत निशाणी ३० ला दाखल आहे. दाव्याचा गुणदोषांवर निपटारा होणेकरिता तसेच फलित व परिणामकारक हुकूमनामा होणेकरिता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. वादीने दाखल केलेली निशाणी २२ व २४ कडील

वादी यांचे वारस अभिलेखावर घेणेस झालेला विलंब व उपशम रद्द होणेबाबतचा अर्ज मंजूर करणेत आलेला आहे. त्यामुळे न्याय हिताचे दृष्टीने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

(१) निशाणी २६ कडील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

(२) वादीने अर्जात नमूद केल्याप्रमाणे दुरुस्ती या अर्जाचे आदेशापासून पुढील तारखेपर्यंत करावी व दुरुस्त अर्जाची प्रत हजर करावी.

(३) सदर दुरुस्तीची नोंद संगणक प्रणालीमध्ये तसेच दाव्याचे नोंद रजिस्टरमध्ये घेणेत यावी.

DEEPALI SHIVAJI CHOTHE

Digitally signed by DEEPALI SHIVAJI CHOTHE
Date: 2022.03.05 18:20:28 +0530

विटा.
दिनांकः-०४.०३.२०२२.

( दीपाली शिवाजी चोथे )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, विटा,
जि. सांगली.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are same as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S.V. Gaikwad |
| Name of the Court | :- | Smt. Deepali S. Chothe,<br>Jt.Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.,<br>Vita. Tal:-Khanapur. |
| Date of decision | :- | 04.03.2022 |
| Order signed by P.O. on | :- | 05.03.2022 |
| Order uploaded on | :- | 05.03.2022 |

-